आरोपीच्या वकीलांनी नि.क्र.६५ कडे अर्ज देऊन आरोपी क्र.१ ते ३ च्या गैरहजरीत प्रकरण चालवण्याची विनंती केली. सदरचा अर्ज आरोपी आरोपी क्र.१ ते ३ ची ओळख भविष्यात आव्हानीत करणार नाही या अटीवर मंजुर करण्यात आली. आरोपीच्या वकीलांनी नि.क्र.६६ कडे अर्ज देऊन आरोपी क्र.४ च्या गैरहजरीत प्रकरण चालवण्याची विनंती केली. सदरचा अर्ज आरोपी आरोपी क्र.४ ची ओळख भविष्यात आव्हानीत करणार नाही या अटीवर मंजुर करण्यात आली.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.ए.एन.अन्सारवाडेकर यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – ललिता भगवान इंगळे,

वय – ४५ वर्षे, व्यवसाय–शेती

राहणार – रा.हालसी हत्तरगा, ता.निलंगा, जि. लातूर

मी आरोपी क्र.१ ते ४ यांना ओळखते. आज न्यायालयात आरोपी क्र.१ ते ४ हजर नाहीत. घटना चार पाच वर्षापूर्वी माझ्या गावी हलसी हत्तरगा येथे माझ्या घराच्या रस्त्यावर सकाळी ७.०० वाजता घडली. त्यावेळी मी झोपेतून उठून, कवाड काढून अंगण झाडत होते. त्यावेळी आरोपी क्र.२ संडासला बसल्या होत्या. मी बोलेले मी रस्त्यातून जाऊ कस, येऊ कस असे म्हणाल्यावर सुवर्णा हिने माझ्या अंगावर पडून मारहाण केली. पुन्हा आरोपी शिवाजी आले व माझ्या उजव्या हाताच्या करंगळीवर लाकडाने मारले. पुन्हा आरोपी क्र.३ व ४ यांनी सर्वांनीच येऊन मला मारले. पवन इंगळे व शालूबाई इंगळे यांना मी सोडवा म्हटल्यावर त्यांनी येऊन भांडण सोडवले. त्यानंतर मी पोलीस स्टेशन कासारसिरसी येथे गेले व अर्ज दिला. आता मला माझा अर्ज वाचून दाखवण्यात आला. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. त्यामुळे तक्रारी जबाबास **निशाणी क्र.६८** देण्यात येतो. त्यानंतर पोलीसांनी दवाखान्यातून आल्यावर माझा पुरवणी जबाब घेतला. आता मला पुरवणी जबाब

वाचून दाखवण्यात आला. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. आरोपीने मला ज्या काठीने मारहाण केली ती दाखवल्यास मी ओळखु शकते. साक्षीदारास एम.आर.क्र.५१/२०२५ कडील काठी दाखविण्यात आली. ती तीच असल्याचे साक्षीदाराने ओळखले. त्यामुळे काठीस **अर्टिकल अ** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपासकरीता आरोपी क्र.१ ते ३ तर्फे अॅड यु.एस.जाधव यांच्यामार्फत सुरु–**

०२. माझे घर गावाच्या पश्चिम दिशेला आहे. माझ्या गावाच्या पश्चिमेला गाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे घर गावच्या एकदम कडेला आहे. माझ्या घराच्या समोरुन पुर्वेस एक सरळ रस्ता जातो. त्या रस्त्याच्या पुर्वेस व पश्चिमेस लोकवस्ती आहे. रसत्याच्या दक्षिणेला काशिनाथ खाटवकर व व्यंकट बनसोडे मला लागून आहेत. रसत्याच्या उत्तरेला शिवाजी सोळुंके यांचे घर आहे. माझ्या घरापासून पुर्वेकडे गेलेला रस्ता माझ्या एकाच घरासाठी आहे. माझ्या घराच्या पश्चिमेला संजीव इंगळे, प्रल्हाद इंगळे व कावेराबाई इंगळे यांचे पडीक घर आहे. माझ्या घराच्या पाठीमागे पश्चिमेला ५० लोक राहतात. माझ्या घराच्या समोरुन गेलेल्या रसत्याच्या दक्षिणेला व उत्तरेला ५० लोक राहतात. परंतु त्यांच्या घराची पाठीमागील बाजु रस्त्याला आहे. त्यांच्या घराला खिडक्या नाहीत. माझ्या घराच्या समोरुन पुर्वेकडे असणाऱ्या रस्तयावर लिंबाचे झाड आहे. ते माझ्या घरापासून २० फुट अंतरावर आहे. त्या लिंबाच्या झाडाच्या उत्तर बाजुला आरोपीचे घर आहे. त्यांच्या घराचे तोंड एक दक्षिणेला आणि एक पुर्वेला आहे. आरोपी हे माझे शेतशेजारी नाही. मी त्यांच्यावर जमिनीचा दावा दाखल केलेला नाही. घटना घडलेली दिवस, तारीख व वार मला सांगता येत नाही. माझ्या गावापासून पोलीस स्टेशन साडेतीन किलोमीटर अंतरावर आहे. घटनेच्या दिवशी मी कासारसिरसी दवाखान्यात जाऊन तेथून निलंग्याला गेले व तेथून उमरगा येथे गेले. मी त्या दिवशी निलंग्याला दुपारी १.०० वाजता आले होते. तेथुन डॉ.विश्वेकर यांच्या हॉस्पीटलला उमरगा येथे गेले. तेथे मला एक रात्र ठेऊन घेतले व नंतर पट्टी करुन पाठवून दिले. डॉ.विश्वेकर यांना

मी हाताला जखम कशामुळे झालेली आहे हे सांगितले नाही. त्यांनी मला विचारले हाताला काय झाले आहे तेव्हा मी सांगितले की, मार लागला आहे. तेथील डॉक्टरांना या लोकांनी मला मारले आहे असे सांगितले नाही. विश्ववेकर हॉस्पीटलची केस पेपरची फाईल मी पोलीसांना दिलेली आहे. घटनेच्या दिवशी सकाळी ८.०० वाजता मी कासारसिरसी पोलीस स्टेशन येथे गेले होते. पोलीसांनी तेथे माझे बयान व अंगठा घेतला होता. माझ्या नावाने अर्ज पोलीसांनी लिहला. घटना घडल्याच्या दिवशी मी पोलीसांना जो अर्ज दिला होता तो पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहलेला आहे. मी पोलीसांना जबाब देतांना, ''घटना काल घडली'' असे सांगितले नव्हते. पोलीसांनी माझ्या जबाबात काल घटना घडली असे लिहले आहे ते खोटे नाही. असे घडले नाही की, घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी मी पोलीस स्टेशनला गेले. मी पोलीसांना जबाब देतांना, ''त्यावेळी मी झोपेतून उठून, कवाड काढून अंगण झाडत होते. त्यावेळी आरोपी क्र.२ संडासला बसल्या होत्या. मी बोलेले मी रस्त्यातून जाऊ कस, येऊ कस असे म्हणाल्यावर सुवर्णा हिने माझ्या अंगावर पडून मारहाण केली'' हा मजकुर सांगितला होता. परंतु तो माझ्या जबाबात का नाही याचे कारण मला सांगता येत नाही. मी पोलीसांना जबाब देतांना, ''पुन्हा आरोपी शिवाजी आले व माझ्या उजव्या हाताच्या करंगळीवर लाकडाने मारले. पुन्हा आरोपी क्र.३ व ४ यांनी सर्वांनीच येऊन मला मारले'' हा मजकुर सांगितला होता. परंतु तो माझ्या जबाबात का नाही याचे कारण मला सांगता येत नाही. असे काही घडले नाही की, घटनेच्या दुसऱ्या दिवशी आरोपी क्र.१ ते ४ यांना रस्त्यावर संडास का करता असे मी म्हणाले. असे काही घडले नाही की, या घटनेच्या दुसऱ्या दिवशी सर्व आरोपींनी मला मारहाण केली. असे काही घडले नाही की, पवन व्यंकट इंगळे व शालू व्यंकट इंगळे यांनी दुसऱ्या दिवशी येऊन भांडण सोडवासोडव केली. असे काही घडले नाही की, घटनेच्या दुसऱ्या दिवशी माझ्यामध्ये व आरोपीमध्ये भांडण, तक्रार व जिवे मारण्याची धमकी दिली. घटना घडल्याच्या दुसऱ्या दिवशी मी अर्टिकल अ ला पाहिले नाही. पोलीस जेव्हा घटनास्थळ पंचनाम्याला आले तेव्हा काठी घेऊन गेले. घटनास्थळ पंचनाम्यावेळी मी

घटनास्थळी हजर होते. घटनास्थळ पंचनामा करताना पोलीसांनी मला अर्टिकल अ दाखवले होते. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा लिहला व दुसऱ्या रस्त्यावर जाऊन, दुकानात जाऊन कोणाच्या सहया घेतल्या मला माहीत नाही. पंचनाम्यावर माझा अंगठा घेतला. हे म्हणणे खरे नाही की, मी बोलेले मी रस्त्यातून जाऊ कस, येऊ कस असे म्हणाल्यावर सुवर्णा हिने माझ्या अंगावर पडून मारहाण केली. पुन्हा आरोपी शिवाजी आले व माझ्या उजव्या हाताच्या करंगळीवर लाकडाने मारले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस केलेली आहे.

**आरोपी क्र.१ ते ३ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र.४ तर्फे अॅड एच.व्ही.गायकवाड यांनी स्वीकृत केला**

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.03.09 17:28:38 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–०९/०३/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, निलंगा